सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे.
दिनांक / ०३/२०१३

**सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची शासन मान्य नामतालिका तयार करण्यासाठी अर्ज मागविण्यासंबंधिची जाहिरात**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ नुसार सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नामिका तयार करण्याकरिता खालील प्रमाणे पात्र व्यक्ती, फर्म कडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | लेखापरीक्षकांचा तपशिल | अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | सनदी लेखापरीक्षकांची व्यवसाय संस्था (Chartered Accountants' Firm) | अ) सनदी लेखापाल अधिनियम, १९४९, अंतर्गत एकापेक्षा अधिक सनदी लेखापालांची व्यवसाय संस्था<br>ब) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक | सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव. |
| २ | सनदी लेखापरीक्षक (Chartered Accountant) | अ) सनदी लेखापाल अधिनियम, १९४९, अंतर्गत सनदी लेखापाल<br>ब) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक | सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव. |
| ३ | प्रमाणित लेखापरीक्षक (Certified Auditor) | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी,<br>ब)सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका (G.D.C&A)<br>क) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक | सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव. |

अर्जाचा नमूना तसेच अनुषंगीक तपशील या विभागाच्या वेबसाईट **sahakarayukta.maharashtra.gov.in** वर उपलब्ध असून अर्ज भरण्यासाठी सुचना व सहकारी संस्थांच्या वर्गीकरणानुसार लेखापरीक्षकांची आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव याचा तपशिल देखील या वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे त्या त्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हयांच्या कार्यालयात अर्जाचा नमुना दिनांक ०७.०३.२०१३ पासून उपलब्ध असेल. पात्र व्यक्तींनी त्यांचा अर्ज परिपुर्ण पध्दतीने व आवश्यक त्या कागदपत्रांसह त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हा उपनिबंधक यांचेकडे दिनांक २१.०३.२०१३ पर्यंत कार्यालय वेळ संपण्यापूर्वी सादर करावेत. उशीरा आलेल्या अर्जांच्या विचार केला जाणार नाही. पॅनलवर निवड झालेल्या पात्र लेखापरिक्षकांची यादी दि. ३१-३-२०१३ पर्यंत अंतिम करुन वेबसाईटवर अवलोकनासाठी उपलब्ध होईल.

http://taxguru.in/